PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Bhagyalakshmi
Year: 1962

Song: Bal guni tu kar angai
Lyricist: Shanta Shelke

बाळ गुणी तू कर अंगाई
बाळ गुणी तू कर अंगाई
जोजविते रे तुजला आई
जोजविते रे तुजला आई
तुझा चंदनी लाल पाळणा
जाई जुईचा मऊ बिछाना
तुझा चंदनी लाल पाळणा
जाई जुईचा मऊ बिछाना
झुलती वरती राघू मैना
मागे पुढती झोका जाई
बाळ गुणी तू कर अंगाई
बाळ गुणी तू कर अंगाई
जोजविते रे तुजला आई

निजले तारे निजले वारे
शांत झोपली रानपाखरे
निजले तारे निजले वारे
शांत झोपली रानपाखरे
जग भवतीचे निजले सारे
चंद्रही करतो गाई गाई
जोजविते रे तुजला आई
बाळ गुणी तू कर अंगाई
जोजविते रे तुजला आई

मंद पाऊली येते रजनी
शिणले डोळे जाग जागूनी
मंद पाऊली येते रजनी
शिणले डोळे जाग जागूनी
अजूनी मिटेना कशी पापणी
निज लडिवाळा निज लवलाई
जोजविते रे तुजला आई
बाळ गुणी तू कर अंगाई
बाळ गुणी तू कर अंगाई

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*